दि. १७/०४/२०२३

लोकमत पू. पान क्र. ३

# लग्न लपवून नवऱ्याचे वहिनीशी विवाहबाह्य संबंध

## पतीसह भावाच्या बायकोविरुद्ध फिर्याद

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : नवऱ्याने भावाच्या बायकोशी मंदिरात लग्न केल्याचे तसेच त्यांचे विवाहबाह्य संबंध असल्याचे उघडकीस आल्यानंतर विवाहितेने नवरा आणि तिच्या भावाच्या बायकोविरुद्ध फिर्याद दिल्यावर भाईंदर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदर पश्चिमेस राहणाऱ्या एकता हिची २०१५ ला मोहित छितरमल गुप्ता (रा. ओंकार टॉवर, डी मार्ट समोर, भाईंदर) याच्याशी ओळख झाली. त्यानंतर प्रेमसंबंधातून २०२० साली त्यांचे लग्न झाले. मात्र, लग्नानंतर मोहित हा रात्री-अपरात्री कोणाशी तरी बोलायचा, घरी उशिरा यायचा, क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ व त्रास द्यायला लागला. त्याने एकता हिला माहेरी पाठवून दिले. नंतर पुन्हा तिला घरी बोलावून घेतले असता २०२१ मध्ये मोहितचे एकताच्या भावाची बायको प्रतिभा (रा. अजमेर) हिच्याशी विवाहबाह्य संबंध असल्याची माहिती व्हॉट्सॲप चॅटद्वारे मिळाली.

नोव्हेंबर २०२२ मध्ये मोहित व प्रतिभा यांना भाईंदरच्या एका लॉजमध्ये एकताने रंगेहाथ पकडल्यावर दोघांनी विवाहबाह्य संबंध असल्याचे कबूल केले. नंतर मोहित याने माफी मागितली आणि घरच्यांनी समजूत काढल्यावर दोघांचा संसार पुन्हा सुरू झाला. मात्र, मोहित व प्रतिभा यांनी २०२० साली मंदिरात लग्न केल्याची छायाचित्रे एकताला सापडली. त्यानंतर तिने १३ एप्रिल रोजी गुन्हा दाखल केला.

# प्रशासनाने पदभार काढून घेत मागविला खुलासा

## व्हिडीओप्रकरणी अधिकाऱ्यास नोटीस

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा भाईंदर महापालिका मुख्यालयात एक महिला अधिकारी आणि दोन कर्मचारी यांच्या उपस्थितीत पैसे मोजून पाकिटात टाकण्याच्या व्हायरल व्हिडीओ क्लिपप्रकरणी खळबळ उडाली आहे. पालिका आयुक्तांच्या आदेशावरून त्या महिला अधिकाऱ्यास नोटीस बजावून खुलासा मागवण्यात आला असून, लेखापरीक्षण विभागातील पदभार काढून घेण्यात आला आहे.

महापालिका मुख्यालयातील चौथ्या मजल्यावर लेखापरीक्षक विभाग असून, कार्यालयात लेखा अधिकारी बसतात. लेखा अधिकारी चारुशीला खरपडे यांच्या दालनातील व्हायरल व्हिडीओमध्ये खरपडेसह सार्वजनिक आरोग्य विभागाचे कार्यालयीन अधीक्षक दत्तात्रय वरकुटे आणि मास्क घातलेला आणखी एक कर्मचारी तसेच अन्य व्यक्ती दिसत आहेत. तसेच २ हजार ५०० रुपयांच्या नोटांचे बंडल मोजताना आणि पांढरे कागदी पाकीट, आदी दिसून आले.

मास्क घातलेले असल्याने तो कोविड काळातील व्हिडीओ असल्याचा अंदाज आहे. या व्हायरल व्हिडीओ प्रकरणाची आयुक्त दिलीप ढोले यांनी दखल घेत खरपडे यांच्याकडील लेखापरीक्षक विभागाचा कार्यभार काढून घेत त्यांना खुलासा मागविला आहे.

### 'ठाणे लाचलुचपत'ने घेतली दखल

पैसे मोजतानाच्या व्हिडिओतील ठेकेदार व्यक्ती हे वरकुटे यांच्यासोबत आल्याचा संशय असून, सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित प्रकरण असताना केवळ खरपडे यांनाच नोटीस बजावल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. या व्हिडीओची दखल ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतली असून, ते माहिती घेत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

Scanned with CamScanner

दि. १७/०४/२०२३

लोकमत पु. पान क्र.3



# गुन्हा दाखल होत नसल्याने फायलींचे पुढे होते तरी काय?

## मीरा-भाईंदरमध्ये प्रश्न कायम, प्रकार अधूनमधून सुरूच

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर महापालिका २००२ सालापासून अस्तित्वात आल्यानंतर फाइल गहाळ होणे, न सापडणे यासारखे प्रकार अधूनमधून होत असतात, मात्र अशा प्रकरणात गुन्हा दाखल केला जात नसल्याने पुढे त्या फायलींचे काय झाले? हे नागरिकांना कळत नाही.

मीरा-भाईंदर महापालिकेत नगररचना विभागात फायली त्या त्या प्रकरणाचे सल्लागार अभियंता वा संबंधित व्यक्ती सह्यासाठी फिरवत असतात. पालिकेच्या सार्वजनिक बांधकाम, पाणी पुरवठा, कर विभाग आदींसह बहुतांश विभागात काही संबंधित ठेकेदार फायली पुढे सरकवण्याचे काम करताना दिसतात. काही तत्कालीन नगरसेवकसुद्धा फायली घेऊन पाठपुरावा करत असतात. कर आकारणी व नळ जोडणीच्या फायलींवर, तर नगरसेवकांची व्हिजिटिंग कार्ड लावलेली असतात.

फाइल गहाळ होणे, न सापडणे असले प्रकार विविध विभागात घडत असतात. त्याची चर्चादेखील होते, मात्र अशा प्रकरणात गुन्हा दाखल करण्याचे टाळले जाते. त्यामुळे कायदेशीर कार्यवाही होत नसल्याने असले प्रकार दडपले जातात. काही प्रकरणात तर नव्याने फाइल बनवली जात असल्याचे किस्से सांगितले जातात. हल्ली शिपायास वा संबंधित विभागातील कर्मचाऱ्यास फाइल पुढे पाठवण्यासाठी सांगितले जाते. वा अधिकाऱ्याकडे बसून ती फाइल मागवून सह्या घेतल्या जातात.

> आयुक्त दिलीप ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली अंदाजपत्रकात मंजूर कामे ही बजेट जिओ टॅगिंग पद्धतीने संगणकावर त्याचे प्रस्ताव व देयके डिजिटली ओटीपीद्वारे मंजूर केली जातात. त्यामुळे प्रकरण प्रलंबित कोणाकडे व किती दिवस राहिले, हे समजते. २०१७-२०१८ पर्यंतचे दस्तऐवज स्कॅनिंग झाले असून काही विभागांची आतापर्यंतची कागदपत्रे स्कॅन झाली आहेत. सरकारकडून ई-ऑफिस प्रणाली येणार आहे. त्याची प्रात्यक्षिके सादर झालेली असून तेदेखील सुरु होणार आहे.
>
> - राज घरत, सिस्टम मॅनेजर, महापालिका



### फाइल कार्यप्रणालीकडे टाळाटाळ

पालिकेने फायलींचे स्कॅनिंग गेल्या काही वर्षांपासून सुरू केले आहे, मात्र माहिती अधिकारात देऊनही फायली संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या जात नाहीत. त्यामुळे भ्रष्टाचार, गैरप्रकार व ब्लॅकमेलिंगसारखे प्रकार रोखावे, असे प्रशासन व माजी नगरसेवकांनासुद्धा वाटत नाही.

ई-फाइल कार्यप्रणाली अमलात आणणे आवश्यक असल्याने अधिकाऱ्यांना तसेच प्रत्येक विभागातील लिपिक आदींना संगणक दिलेले आहेत, मात्र ई-फाईल पद्धतीचा अवलंब करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जाते. नगररचना विभागातील बांधकाम प्रस्तावही ऑनलाइन पद्धतीने सादर करणे बंधनकारक असताना तसे केले जात नाही.

लोकमत पान क्र.7

# आरोपींची बडदास्त, ५ पोलिस निलंबित

## अधिकाऱ्यांच्या खोलीत ठेवल्याने कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : पालिका बसच्या कर्मचाऱ्यांना मारहाण करणाऱ्या आरोपींना पोलिस कोठडीत न ठेवता पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांच्या खोलीत ठेवल्याप्रकरणी मीरा रोड पोलिस ठाण्याचा अधिकारी आणि नया नगर पोलिस ठाण्याचे चार पोलिस कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले आहे.

मीरा रोड रेल्वे स्थानकाजवळच्या चौकात उभी केलेली कार बाजूला घेण्यास सांगितल्यावरून टॉप १० दुकानाचा चालक अनिल छेडा (वय ३१) व त्याचा कर्मचारी बनारसी मिश्रा (३५, दोघेही रा. लक्ष्मी सोसायटी, विरार पश्चिम) यांनी ११ फेब्रुवारीला मीरा-भाईंदर महापालिका परिवहन सेवेच्या कर्मचाऱ्यांना मारहाण, शिवीगाळ व दमदाटी करत गोंधळ घातला होता. नया नगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून छेडा व मिश्रास अटक केली होती.

दोघांना मीरा रोड पोलिस ठाण्यातील पोलिस कोठडीत ठेवण्यात आले होते, मात्र त्यांना कोठडीतून बाहेर काढून पहिल्या मजल्यावर नेऊन ठेवण्यात आले होते. याबाबतची तक्रार वरिष्ठांपर्यंत गेल्यावर चौकशी झाली. चौकशीत सदर प्रकार घडल्याचे पोलिस ठाण्यातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये आढळून आले. अहवालानंतर अपर पोलिस आयुक्त श्रीकांत पाठक यांनी त्यावेळी कर्तव्यावर असलेले मीरा रोड पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक मिलिंद बोरसे आणि आरोपीचे लॉकअप गार्ड म्हणून तैनात नया नगर पोलिस ठाण्यातील पोलिस कर्मचारी बाबूराव गरुड, विजेंद्र दिवेकर, कैलास ठोसर आणि रामेश्वर तारडे या ५ जणांना पुढील आदेशापर्यंत निलंबित केले आहे. सदर पोलिसांनी संगनमत करून आरोपींना कोठडीत न ठेवता पहिल्या मजल्यावर ठेवल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

### अन्य दोषींवर कारवाई होण्याची शक्यता

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार उपनिरीक्षक बोरसे हे आधी नया नगर पोलिस ठाण्यात कार्यरत असताना त्यांची आरोपी छेडाशी ओळख होती. बोरसे यांच्या सांगण्यानुसार नया नगरच्या चार पोलिस कर्मचाऱ्यांनी आरोपींना लॉकअपमधून काढून पहिल्या मजल्यावर नेले. अधिकाऱ्याने चुकीचे सांगितल्यावर कर्मचाऱ्यांनी नाही म्हणण्याचे धाडस दाखवणे आवश्यक होते. वास्तविक पोलिस कोठडीच्या चाव्या या मीरा रोड पोलिसांकडे असतात. शिवाय मीरा रोड पोलिसांची ती जबाबदारी असते. त्यामुळे कोठडी कोणी उघडून दिली आणि कोणाच्या सांगण्यावरून दिली? यातील संबंधित जबाबदारी असणाऱ्या अन्य दोषींवर कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पृ. पान क्र. १

दि. १०/०४/२०२३

# मनपा नियुक्त ठेकेदाराकडून केली जातेय वाहनचालकांची लूट

## पार्किंगसाठी दिलेल्या दरापेक्षा जास्त शुल्क वसूल

**मीरा रोड :** मीरा रोड रेल्वे स्थानकाबाहेर मीरा-भाईंदर महापालिकेने नागरिकांच्या सुविधेसाठी वाहनतळ सुरू केले आहे. हे वाहनतळ चालवण्यासाठी ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. महापालिकेने या वाहनतळात वाहने उभी करण्यासाठी शुल्क निश्चित केले आहे. वाहचालकाकडून निश्चित करून दिलेल्या शुल्कापेक्षा दुप्पट शुल्क ठेकेदाराकडून वसूल केले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मनपाने पार्किंगसाठी निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त शुल्क घेऊन ठेकेदाराकडून वाहनचालकांची लूट केली जात आहे.



मीरा-भाईंदर शहरातील वाहनचालकांच्या सोयीसाठी महापालिकेने मीरा रोड रेल्वे स्थानकाबाहेर पे अँड पार्क सुविधा उपलब्ध करून दिली आहे. महापालिकेने हे वाहनतळ चालवण्यासाठी आशुतोष एंटरप्राईजेस या ठेकेदाराची नियुक्ती केली आहे. वाहनतळात वाहने उभी करण्यासाठी महापालिकेकडून तासानुसार शुल्क निश्चित करून देण्यात आले आहे. या शुल्कानुसारच ठेकेदाराने वाहनचालकांकडून शुल्क घ्यायचे आहे. ठेकेदारासोबत तसा करारनामा करण्यात आलेला आहे. करारनाम्यात दर निश्चित केलेले असताना ठेकेदाराकडून मनमानीपणे वाहनचालकाकडून शुल्क वसुली केली जात आहे. यापूर्वीदेखील जुन्या ठेकेदाराकडून असाच प्रकार सुरू होता, त्यामुळे त्या ठेकेदाराचा ठेका रद्द केला.

> “ वाहनतळ ठेकेदाराकडून जास्त शुल्क वसूल करण्यात येते, त्याची तपासणी केली जाईल. तेथील वस्तुस्थितीची माहिती घेऊन ठेकेदारावर योग्य ती कार्यवाही केली जाईल.
>
> – कल्पिता पिपळे, उपायुक्त, मीरा-भाईंदर महापालिका

### दुचाकी स्वाराला शुल्काचा बसला फटका

भाईंदर येथील रहिवासी कृष्णा गुप्ता यांनी त्यांची मोटारसायकल रात्री पावणेबारा वाजता या वाहनतळावर उभी केली. महापालिकेच्या दरानुसार बारा तासांसाठी कंत्राटदाराने २० रुपये घेणे आवश्यक होते. मात्र कंत्राटदाराने त्यांच्याकडून २४ रुपये घेऊन त्याची पावती दिली. गुप्ता हे त्यांची मोटारसायकल घेण्यासाठी दुसऱ्या दिवशी दुपारी चार वाजता गेले.

त्यावेळी सतरा तास त्यांची मोटारसायकल उभी असल्यामुळे कंत्राटदाराने चोवीस तासाचे शुल्क आकारले. महापालिकेने चोवीस तासांसाठी २५ रुपये इतके शुल्क निश्चित करून दिले आहे; पण कंत्राटदाराने गुप्ता यांच्याकडून आणखी २४ रुपये घेतले म्हणजेच चोवीस तासांसाठी ४८ रुपये शुल्क वसूल केले.

यावेळी गुप्ता यांनी कंत्राटदाराकडे महापालिकेने निश्चित केलेल्या शुल्काची यादी मागितली; पण कंत्राटदाराने ती दाखवण्यास नकार दिला. त्यामुळे कृष्णा गुप्ता यांनी आयुक्त दिलीप ढोले याना ई-मेलद्वारे तक्रार दिली आहे.

तक्रारीसोबत कंत्राटदाराने घेतलेल्या शुल्काच्या पावत्यादेखील जोडल्या आहेत. तक्रारीत गुप्ता यांनी महापालिकेने निश्चित केलेल्या दरापेक्षा ठेकेदाराकडून जास्त वसुली केली जात आहे. हे करारामधील अटी शर्तींचे उल्लंघन आहे. त्यामुळे ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करून त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी गुप्ता यांनी आयुक्तांकडे केली आहे.

# नफा देण्याचे आमिष दाखवून ७१ लाखांची फसवणूक

**मीरा रोड :** मीरा रोड येथील कनाकीया परिसरात राहणारे जगदीश शाहरी यांना व त्यांच्या पत्नीला शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला नफा देण्याचे आमिष दाखवून ७१ लाखांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




मीरा रोड येथील कनाकीया परिसरात राहणारे जगदीश शाहरी यांच्या पत्नी दिव्या शाहरी या विलेपार्ले येथे कामाला असून त्या रेल्वेने प्रवास करतात. प्रवासादरम्यान त्यांची ओळख डिम्पल गुप्ताशी झाली होती. ते नियमित एकत्र प्रवास करत असल्याने त्यांची चांगली मैत्री झाली होती. प्रवासादरम्यान डिम्पल गुप्ताने दिव्याला सांगितले की, तिची मैत्रिण शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करते व त्यामुळे तिला चांगले नफा मिळतो. त्यावेळी दिव्याने त्याकडे दुर्लक्ष केले. २०१३ मध्ये डिम्पल दिव्याच्या घरी आली त्यावेळी तिने दिव्याच्या सासूला १ लाख रुपये गुंतवणूक केल्यास ८ हजार रुपये प्रत्येक महिन्याला मिळतील, असे सांगितले. त्यावेळी त्यांनी १ लाख रुपये गुंतवणूक करण्यास सांगून डिम्पलच्या बँक खात्यामध्ये पैसे दिले. त्यानंतर दर महिन्याला ८ हजार रुपये परत दिले. ती वेळेत पैसे पाठवत असल्याने तिने जगदीश, त्यांची पत्नी व आईचा विश्वास संपादन करून घेतला होता. त्यानंतर २०१५ मध्ये डिम्पलने पाच लाख रुपये गुंतवणूक केल्यास सहा महिन्यांनंतर ८ लाख रुपये मिळतील, असे सांगितले. त्यांनी ५ लाखांची गुंतवणूक केली. सहा महिन्याने डिम्पल हिने ८ लाख रुपये परत केले. त्यावेळी डिम्पलला गुंतवणूक करणाऱ्या तिच्या मैत्रिणीबाबत विचारले असता तिने तिच्या मैत्रिणीचे नाव शर्मिला अडसुळे असल्याचे सांगितले होते. त्यानंतर पुन्हा गुंतवणूक केली होती.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पृ.पान क्र.५

दि.१७/०४/२०२३

लोकमत पान क्र. 7

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी मोहन पाटील

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी काही महिन्यांपूर्वी अरुण कदम यांची निवड करण्यात आली होती. त्यांच्या जागी जिल्हाध्यक्षपदी मोहन पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मीरा-भाईंदर शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महापालिकेवर एकेकाळी सत्ता होती; परंतु गेल्या २०१७ च्या निवडणुकीत एकही नगरसेवक निवडून आला नाही. त्यामुळे शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे अस्तित्व धोक्यात आले आहे. २०१७ नंतर आतापर्यंत तीन - चार जणांना जिल्हाध्यक्ष पदावरून काढण्यात आले आहे. अंतर्गत वादामुळे पक्षवाढ होत नसल्याचे सांगितले जाते. जिल्हाध्यक्षपदी असलेले अरुण कदम यांना पक्षातून काढले असून त्यांच्या जागी पुन्हा आता मोहन पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्ष बळकटीसाठी व पक्ष मजबूत करण्यासाठी तसेच पक्षाची ध्येय धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी चांगले काम करावे, असे त्यांना नियुक्ती पत्र देताना सांगितले आहे.

# चौदाव्या मजल्यावरून पडून कामगाराचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पाण्याची टाकी बांधताना चौदाव्या मजल्यावरून खाली पडल्याने विरारमध्ये एका कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

मनवेलपाडा येथील श्रीहरी दर्शन बिल्डिंगमध्ये श्यामसुंदर कांताप्रसाद राजभर (२१) याचा शनिवारी सकाळी बिल्डिंगच्या चौदाव्या मजल्यावर भाऊ परशुराम राजभर याच्यासोबत पाण्याच्या टाकीचे बांधकाम करत असताना सुरक्षिततेची उपाययोजना न केल्याने लोखंडी अँगलसह खाली पडून मृत्यू झाला होता. विरार पोलिसांनी शनिवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. तमअप्पा पेरमल्ला व श्रीहरी दर्शन बिल्डिंग मंगलमूर्ती डेव्हलपर्सचे विकासक यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महिला वाहतूक पोलिसाला धक्काबुक्की

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** कर्तव्यावर असलेल्या महिला वाहतूक पोलिसाला धक्काबुक्की केल्याप्रकरणी नालासोपारा येथे चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिविक सेंटर, हनुमान मंदिराजवळ महालक्ष्मी मोबाइल शॉपसमोर शनिवारी सकाळी दहाच्या सुमारास महिला वाहतूक पोलिस सुनीता काशिनाथ जाधव यांनी वाहतुकीस अडथळा आणणारी वाहने काढून टोइंग करीत असताना रामविलास विश्नोई, कैलास विश्नोई, शेराराम विश्नोई व गणपतलाल विश्नोई यांनी त्यांना दमदाटी करत हुज्जत घातली होती. वाहतूक शाखेचे पोलिस भरत मुढे हे मदतीला गेले असताना चारही आरोपींनी त्यांना सरकारी कामात अडथळा आणत धक्काबुक्की करत महिला पोलिसाला शिवीगाळ व दमदाटी केली. दरम्यान, कर्तव्यावर असताना एका महिला वाहतूक पोलिसाला धक्काबुक्की झाल्याने संताप व्यक्त होत आहे.

# धक्कादायक! वाहतूक पोलिसाला बोनेटवरून नेले फरफटत

**नवी मुंबई :** अमली पदार्थ व स्फोटके असल्याच्या संशयावरून कारला थांबवण्याचा प्रयत्न करणाऱ्या वाहतूक पोलिसाला एका कार चालकाने बोनेटवरून वाशीतून थेट पामबीच मार्गावरुन उरण रोडवर १० ते १२ किलोमीटर फरफटत नेल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पोलिसांनी या कारचा पाठलाग करतानाच उरण रोडवर दोन ट्रेलर आडवे लावून कार अडवून बोनेटवर असलेल्या वाहतूक पोलिसाची सुटका केली. त्यानंतर कार चालक तरुणाला ताब्यात घेऊन वाशी पोलिसांच्या स्वाधीन केले. नवी मुंबईतील विविध चौकातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात वाहतूक पोलिसाचे



कारच्या बोनेटवरील थरारक चित्रण कैद झाले आहे.

या घटनेतील कारच्या बोनेटवरून फरफटत नेलेले वाहतूक पोलीस सिद्धेश्वर माळी हे वाशी वाहतूक शाखेत कार्यरत असून शनिवारी दुपारी ते वाशीतील ब्ल्यू डायमंड चौकात वाहतूक नियमनासाठी कार्यरत होते. यावेळी कोपरखैरणे येथून वाशीच्या दिशेने येणाऱ्या कारमध्ये अमली पदार्थ अथवा स्फोटके असल्याचा संशय आल्याने पोलीस नाईक माळी यांनी कार चालकाला थांबण्याचा इशारा केला. मात्र कार चालक आदित्य बेमडे याने (२२) त्या ठिकाणी न थांबता पलायन केले. त्यामुळे माळी यांनी मोटरसायकलने कारचा पाठलाग करून त्याला एपीएमसीतील अन्नपूर्णा चौकात थांबवले. यावेळी माळी यांनी कारला अडवण्याचा प्रयत्न केला असता, आदित्यने त्यांच्या अंगावर गाडी घालून पळून जाण्याचा प्रयत्न केला.

त्यामुळे माळी यांनी स्वतःला वाचविण्याचा प्रयत्न करत कारचे बोनेट पकडले. यावेळी आदित्यने न थांबता, त्यांना बोनेटवर लटकलेल्या अवस्थेत ठेवून भरधाव वेगात पामबीच मार्गावरून थेट उरणच्या दिशेने १० ते १२ किमी पळवून नेली. अन्नपूर्णा चौकात असलेल्या वाहतूक पोलिसांनी नियंत्रण कक्षाला माहिती देऊन कारचा पाठलाग केला. आदित्य उरणच्या दिशेने भरधाव वेगात जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर गव्हाणफाटा येथील वाहतूक पोलिसांनी साई मंदिर येथे भररस्त्यात दोन ट्रेलर आडवे लावून माळी यांची सुटका केली. त्यानंतर आदित्यला कारसह ताब्यात घेऊन वाशी पोलिसांच्या स्वाधीन केले. आदित्य बेमडे हा नशेत असल्याचे वैद्यकीय तपासणीत आढळून आले आहे.

Scanned with CamScanner

सामना पान क्र.6

दि. 17/04/2023

पोलिसांची एण्ट्री होताच आयोजकांची पळापळ

# भाईंदरच्या आंबा महोत्सवात 'जुगार महोत्सव'

## लहान मुलांसाठी गेम लावतो सांगून थाटला अड्डा

भाईंदर, दि. १६ (सा.वा.) – आंबा महोत्सव म्हटला की, त्यात हापूस आंब्यापासून सर्व प्रकारच्या आंब्यांची हजेरी असते. खवय्ये आपल्या आवडीचा आंबा खरेदी करून जिभेचे चोचले पुरवतात. भाईंदर पूर्वेतील एका मैदानावर झालेल्या आंबा महोत्सवात चक्क 'जुगार महोत्सव' भरला होता. पोलिसांची एण्ट्री होताच जुगार चालवणाऱ्या आयोजकांनी धूम ठोकली असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. आंबा महोत्सवात जुगाराचा स्टॉल लावण्यास परवानगी दिली कोणी, असा सवाल भाईंदरवासीय करीत आहेत.

१४ एप्रिलपासून हा आंबा महोत्सव सुरू झाला. त्यात महाराष्ट्राच्या विविध भागांतील आंबा उत्पादकांनी भाग घेतला. आज या महोत्सवाचा शेवटचा दिवस होता. मीरा-भाईंदर महापालिका, कोकण कृषी विभाग व दीपस्तंभ बहुउद्देशीय राष्ट्रीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा मँगो-मिलेट महोत्सव पार पडला. त्याचे उद्घाटन पालिका आयुक्तांच्या हस्ते करण्यात आले होते. आंब्यापासून तयार केलेले अनेक पदार्थ तसेच जेवणाचे स्टॉलदेखील या महोत्सवात होते.

लहान मुलांच्या खेळांचा स्टॉल लावायचा आहे असे सांगून पहिल्याच दिवशी दोन टेबल टाकण्यात आले होते. पण प्रत्यक्षात लहान मुलांच्या खेळाऐवजी तेथे पट नावाचा जुगार सुरू असल्याचे निदर्शनास आले. सो का एक हजार... सो का एक हजार.. असे या स्टॉलवरील लोक ओरडत होते. आंबा महोत्सवात चक्क जुगार चालल्याचे



बघून अनेकांना धक्का बसला. याबाबतची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी तातडीने धाव घेतली. पण तोपर्यंत आयोजक पसार झाले होते. यामागे विशाल शर्मा नावाची व्यक्ती असल्याचे सांगण्यात येत असून त्याने लहान मुलांचे गेम लावतो असे सांगत थेट जुगाराचाच स्टॉल मांडला.

### चौकशी करणार

आंबा महोत्सवात जुगार सुरू असल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. यासंदर्भात संबंधितांना बोलावून त्यांची चौकशी केली जाईल, असे नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार यांनी सांगितले. जुगार स्टॉल लावण्यासाठी परवानगी कोणी व कशी दिली याबाबत पालिकेच्या प्रभाग अधिकारी सविता बोरसे यांना विचारले असता त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. त्यामुळे यामागील गूढ वाढले आहे.

सामना पान क्र. 7

# विरारमधील मृतांच्या कुटुंबीयांना शिवसेनेचा मदतीचा हात

वसई, दि. १६ (सा.वा.) – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला विरारच्या मनवेलपाडा येथे निघालेल्या मिरवणुकीत विजेचा झटका लागल्याने दोघांचा मृत्यू झाला होता. या मृत तरुणांच्या कुटुंबीयांची आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) संपर्कप्रमुख आमदार सुनील शिंदे यांनी भेट घेत सांत्वन केले. तसेच जखमींचीही रुग्णालयात जाऊन विचारपूस केली. यावेळी गरजवंतांना तातडीची मदत म्हणून आर्थिक मदत दिली.

कारगील चौकातून मिरवणूक संपवून कार्यकर्ते घरी परतत असतानाच मिरवणूक वाहनावरील रॉड जवळील रोहित्राला लागला. यात ट्रॉलीवर उभे असलेले सहा जण अक्षरशः होरपळले. यात रूपेश सुर्वे (३०) आणि सुमित सूत (२३) या दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला असून जखमी उमेश कनोजिया (१८), राहुल जगताप (१८), सत्यनारायण (२३) यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याची शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दखल घेत आमदार सुनील शिंदे यांना जखमींची भेट घेण्याच्या सूचना केल्या. त्यानुसार आज सुनील शिंदे यांनी जिल्हाप्रमुख पंकज देशमुख यांच्यासह जखमींची विचारपूस केली. तसेच मृतांच्या कुटुंबीयांचेही सांत्वन करत आर्थिक मदत केली.

यावेळी जिल्हाप्रमुख पंकज देशमुख, उपजिल्हाप्रमुख प्रवीण म्हाप्रळकर, सहसचिव गिरीश दिवानजी, तालुकाप्रमुख स्वप्नील बांदेकर, उपतालुकाप्रमुख मनीष वैद्य, विरार शहरप्रमुख उदय जाधव, नालासोपारा शहरप्रमुख प्रदीप सावंत, महिला शहर संघटक शीला लष्करे, रोशनी जाधव, साक्षी जाधव, विभागप्रमुख संतोष राणे, उपविभागप्रमुख सुनील चव्हाण, शाखाप्रमुख तुकाराम भुवड, नितेश कुवेसकर, प्रीतम रावराणे, दिलीप जाधव, नेहा चव्हाण, शिल्पा वाघेला आदी शिवसैनिक, युवासैनिक व महिला आघाडी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### विजेचा झटक्याने दोघांचा मृत्यू



### भोंगळ कारभार जीवावर

आमदार सुनील शिंदे यांनी महावितरणच्या भोंगळ कारभारावर टीका करत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळेच दोन तरुणांना जीव गमवावे लागल्याचा आरोप केला. शहरात एकही चांगले रुग्णालय नसल्याने या जखमींना मुंबईला हलवावे लागते असून त्यांना सर्वतोपरी मदत करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## कामगाराचा मृत्यू

भाईंदर : वॉशिंग सेंटरमध्ये लाईटचे काम करणाऱ्या कामगाराचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. नीलेश प्रजापती असे त्याचे नाव आहे. याप्रकरणी नवघर कार वॉशिंग सेंटर मालकाविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नीलेश प्रजापती (२४) हा भाईंदर पूर्वेला असलेल्या हरी ओम मारुती वॉशिंग सेंटर येथे गाडी धुण्याचे काम करायचा. कार वॉशिंगचे काम सुरू असताना ईलेक्ट्रिक शॉक लागून तो जखमी झाला. त्याला उपचारासाठी टेंभा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तो मृत झाल्याचे जाहीर केले. हातातील नोझलमध्ये करंट गेल्याने शॉक लागून नीलेशचा मृत्यू झाला.

Scanned with CamScanner

# नालासोपाऱ्यातून गांजा जप्त

**नालासोपारा :** नालासोपारा येथे गांजा जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. वाघोबा मंदिर परिसरात शुक्रवारी संध्याकाळी सहाच्या सुमारास निळेमोरे येथे राहणारा आरोपी सुमित संजय लोध (२०) हा तरुण संशयास्पदरीत्या वावरताना नालासोपारा पोलिसांना आढळून आला होता. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडील बॅगेत ७७१ ग्रॅम वजनाचा गांजा हा अमली पदार्थ व दोन मोबाइल असा एकूण २६ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल आढळून आला होता. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून शुक्रवारी नालासोपारा पोलिस ठाण्यात गुंगीकारक औषधी द्रव्य व मनप्रभावी पदार्थ अधिनियम कलमाखाली गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Apr 16, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

दक्षता घ्यावी : नागरिकांना पोलिस आयुक्तालयाचे आवाहन

# राहा दक्ष, अन्यथा वर्क फ्रॉम होमच्या आमिषाने व्हाल लक्ष्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पोलिस आयुक्तालयात वर्क फ्रॉम होमच्या नावाने होणाऱ्या फसवणुकीच्या घटनांना आळा घालण्यासाठी नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन पोलिस प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

आज तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात होत असून दुसरीकडे सायबर गुन्ह्यांची संख्याही वाढली आहे. सायबर गुन्हेगार लोकांना वेगवेगळ्या मार्गाने गंडा घालण्याचा प्रयत्न करतात. ज्यांना सायबर सुरक्षेबाबत कल्पना असते ते यामधून वाचतात. मात्र, बहुतांश लोक सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात सहज अडकतात आणि नुकसान करून बसतात. सध्या घरबसल्या सोशल मीडियावर काही तासांमध्ये घरून काम करून पैसे कमवा, अशी जाहिरात आणि त्याच्या लिंक अनेकांच्या मोबाइलवर सर्रास पाहायला मिळतात. या लिंकद्वारे चॅट बॉक्स ओपन झाल्यानंतर वेबसाइटची लिंक पाठवून त्यात स्वत:ची नावनोंदणी करण्यास सांगून सुरुवातीला पैसे पाठवून विश्वास संपादन केला जातो. मग कमिशनच्या नावाने पैसे पाठविण्यास सांगून फसवणूक होते, वेगवेगळ्या टास्कमध्ये रिव्ह्यू करा, टॅग करा, लाइक्स करा असे करून तुम्हाला दहा हजार रुपये मिळतील; परंतु त्याकरिता तुम्हाला पॅकेज घेतल्यानंतर मोठमोठ्या रकमेचे आमिष दाखवून फसवणूक करण्यात येते आणि अनेक जण या भूलथापांना बळी पडून फसतात. तरीही सायबर गुन्हे कक्षाद्वारे नागरिकांना याबाबत वारंवार सावधानतेचा इशारा दिला जातो.

## अनोळखी नंबरवरील एसएमएसवर क्लिक करू नका

**१** अनोळखी नंबरवरून आलेल्या एसएमएस लिंकवर क्लिक करू नये. गोपनीय माहिती वेबसाइटवर भरण्यापूर्वी नमूद वेबसाइटच्या यूआरएल काळजीपूर्वक तपासा. बँकेचे कार्ड तपशील, पिन, ओटीपी, पासवर्ड इ. वैयक्तिक किंवा आर्थिक माहिती कोणासोबत शेअर करू नका.

**२** लिंकवर क्लिक करण्यापूर्वी आधी विचार करा. कोणत्याही ॲपवर येणाऱ्या फसव्या लिंक्सवर क्लिक करू नये. नामांकित कंपन्यांमध्ये वर्क फ्रॉम होमद्वारे पैसे कमावण्याच्या आमिषाला बळी पडू नका, असे आवाहन सायबर गुन्हे कक्षाने केले आहे.

**३** आयुक्तालयांतर्गत शहरातील नागरिकांनी अशा फसवणुकीबाबत सतर्क राहावे, तसेच कोणाचीही फसवणूक झाल्यास तत्काळ नजीकच्या पोलिस ठाणे, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. अथवा १९३० या हेल्पलाइनवर संपर्क साधून तक्रार द्यावी, असेही पोलिसांनी सांगितले.



Hello Vasai
Page No. 3 Apr 16, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत



रिक्षा आणि दुचाकी चोरणाऱ्या एका आरोपीला अटक करण्यात तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलिसांना यश आले आहे.

Hello Vasai
Page No. 1 Apr 16, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# रिक्षा, दुचाकी चोरणारा अटकेत, ५ गुन्ह्यांची उकल

## तुळींज गुन्हे प्रकटीकरण पथकाची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : रिक्षा आणि दुचाकी चोरणाऱ्या एका आरोपीला तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीकडून पाच गुन्ह्यांची उकल करून चोरीच्या चार रिक्षा आणि एक दुचाकी हस्तगत करण्यात यश मिळाल्याचे तुळींज पोलिसांनी शनिवारी सांगितले.

विरार वाहतूक विभागाचे पोलिस उपनिरीक्षक एम. के. सूर्यवंशी यांनी तुळींज पोलिस ठाण्याचे पोलिस हवालदार आनंद मोरे यांना संपर्क साधून बनावट नंबर प्लेटचा वापर करून एकजण रिक्षा चालविताना सापडल्याचे सांगितले. त्या रिक्षा चोरीबाबत तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याची माहिती वाहतूक पोलिसांना दिली. पोलिस हवालदार मोरे आणि पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पाहणी केली. शिशकुमार गुप्ता याच्याकडे ही चोरीची रिक्षा मिळून आली. विचारपूस केल्यावर ती रिक्षा त्याचा मित्र प्रकाश त्रिवेदी याच्याकडून घेतल्याचे सांगून आणखी दोन चोरीच्या रिक्षा त्याने व त्याचा मित्र राकेश याने विरार येथील रिक्षावाल्यांना विक्री केल्याचे सांगितले.

ही अटकेची कामगिरी पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी, सहायक पोलिस आयुक्त चंद्रकांत जाधव यांचे मार्गदर्शनाखाली तुळींजचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक मिथुन म्हात्रे, सहायक पोलीस उपनिरीक्षक शिवानंद सुतनासे, पोलिस हवालदार आनंद मोरे, म्हाळू आव्हाड, दशरथ वाळूळे, उमेश वरठा, आशपाक जमादार, पांडुरंग केंद्रे, छबरीबन, राऊत तसेच विरार वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरीक्षक मधुकर सूर्यवंशी, पोलिस हवालदार संतोष चकोर, योगेश भारुडे यांनी केली आहे.

### साथीदारालाही मुंबईतून घेतले ताब्यात

तुळींज आणि वाहतूक पोलिसांनी दोन्ही रिक्षा जप्त करून घेसिस नंबरची माहिती घेतल्यावर त्या रिक्षांबाबत विरार आणि तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याचे समोर आले. रिक्षाचा पंचनामा करून आरोपी शिशकुमार याला अटक करण्यात आली. तपासादरम्यान शिशकुमार याचा साथीदार प्रकाश त्रिवेदी उर्फ मारवाडी याचा तांत्रिक विश्लेषणाद्वारे शोध घेऊन त्याला मुंबई येथून ताब्यात घेतले. त्याच्याकडूनही एक रिक्षा आणि एक दुचाकी हस्तगत केली आहे.



Scanned with CamScanner

दैनिक आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : १२ | अंक. ०२१ | रविवार १६ एप्रिल २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०८

# गुन्हे शोध कक्षाची कारवाई; लाखोंच्या मालासह दोन अट्टल गुन्हेगारांना अटक

**वसई.** चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यातील दोन चोरट्यांना जेरबंद करण्यात वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध कक्षाच्या पथकाला यश आले आहे. या दोघांच्या अटकेने १० गुन्ह्यांचे (चोरी) गूढ उकलले आहे. आणि तीन लाखांहून अधिक किमतीचा माल जप्त करण्यात आला आहे. डीसीपी (परिमंडळ २) पौर्णिमा चौगुले श्रृंगी आणि एसीपी चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सीनियर पीआय कैलाश बर्वे आणि वालीव पोलीस स्टेशनचे सीनियर पीआय कैलास बर्वे यांच्या नेतृत्वाखाली एपीआय ज्ञानेश फडतरे आणि राहुलकुमार पाटील (गुन्हे पीआय) यांच्या पथकाने हे यश मिळवल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलीस, वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिवसेंदिवस चोरी व घरफोडीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ



होत असून, या संदर्भात वरिष्ठांनी गुन्हे उघडकीस आणण्यासाठी व गुन्हे रोखण्याबाबत सूचना व मार्गदर्शन केले होते. त्यानुसार वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्ह्यांचा शोध गुप्ता आधारावर माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि गुन्ह्याच्या ठिकाणाहून मिळालेल्या माहितीवरून सेलच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आरोपी (१) भावेश महेश वेदक (२२) आणि बदरियालम अकलाकाख चौधरी उर्फ पप्पू (३०) यांना ७ एप्रिल रोजी ताब्यात घेतले. पोलिसांनी सांगितले की त्याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता, वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत त्याने १० गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असून त्याला अटक करण्यात आली असून, दागिने व इतर साहित्य एकूण ३,४२,००० रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner

# रिक्शा व मोटर सायकल चोरी करणाऱ्या इसमास अटक

## तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश



विरार: विरार वाहतुक शाखेचे पोउनि. एम. के. सुर्यवंशी यांनी तुळींज पोलीस ठाणे येथील पोहवा/मोरे यांना संपर्क साधुन माहीती दिली कि, त्यांना तसेच त्यांचे वाहतुक विभागातील स्टाफ यांना बनावट नंबर प्लेट चा वापर करून रिक्षा चालवताना मिळुन आल्या असल्याचे सांगुन सदरबाबत माहीती प्राप्त केली असता सदर रिक्शाबाबत तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असल्याचे माहीती दिली. त्यावेळी पोहवा / मोरे तसेच इतर स्टाफ असे सदर ठिकाणी जावुन पाहणी केली असता इसम नामे शशिकुमार गुप्ता याचेकडे सदरची चोरीची रिक्शा मिळुन आली. लागलीच पोहवा/मोरे यांनी त्याचेकडे विचारपुस केली असता त्याने सदरची रिक्शा ही त्याचा मित्र प्रकाश त्रिवेदी याचेकडुन घेतल्याचे सांगुन आणखी दोन चोरीच्या रिक्शा त्याने व त्याचा मित्र राकेश याने विरार येथेल रिक्शावाल्यांना विक्री केल्याचे सांगितले. त्यानंतर लागलीच पोहवा/ मोरे तसेच वाहतुक शाखेचे कर्मचारी यांनी मिळुन इतर दोन रिक्शा ताब्यात घेवुन सदरच्या रिक्शाचे चेसीस क्रमांकाची माहीती प्राप्त करून माहीती घेतली असता सदरच्या रिक्शाबाबत तुळींज तसेच विरार पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असल्याचे समजले. सदर रिक्शांचा पंचनामा करून सदरच्या रिक्शा जप्त करून आरोपी शिशकुमार यास नमुद अटक करण्यात आली. गुन्हयाचे तपासादरम्यान शिशकुमार याचा साथीदार प्रकाश त्रिवेदी ऊर्फ मारवाडी याचा तांत्रिक विश्लेषाद्वारे शोध घेवुन त्यास मुंबई, अंधेरी येथुन ताब्यात घेवुन त्यास पोलीस ठाण्यात आणुन त्याचेकडे विचारपुस केली असता त्याने जप्त तीन रिक्शा व्यतिरिक्त आणखी एक रिक्शा तसेच एक पल्सर मोटरसायकल चोरी केली असल्याचे सांगितल्याने सदरची रिक्शा तसेच पल्सर मोटरसायकल जप्त करण्यात आली आहे.

Scanned with CamScanner